K.T.S.P.Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya

Rajgurunagar, Tal-Khed, Dist- Pune

## 2022-23

## Report

| | |
|---|---|
| The title of the event | Marathon competition |
| Organizing Department | Department of Physical Education & Sports |
| The name of the organizer / coordinator | Prof.Pratima Lonari |
| Dated | 29th August 2022 |
| Venue | Khed Bypass Highway |
| Number of participants | 100 |
| Target group | College Students |
| Introduction | Under the Government of India's Fit India Campaign, an marathon competition was organized on the occasion of National Sports Day and Martyr Rajguru Jayanti in the college on 29th August 2022. |
| The objectives of the program | The main objective of this program is to keep the body and health of the students healthy. |

(Prof.Pratima Lonari)
Director of Physical Education & Sports

Director of Phy. Edn.
H. R. Mahavidyalaya
Rajgurunagar, Pune.

(Dr.S.S.Pingale)
Principal

Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal. Khed,
Dist. Pune. 410 505.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

Scanned with ACE Scanner

खे.ता.शि.प्र.मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, पुणे ४१०५०५

## सूचना

दिनांक : २४ ऑगस्ट २०२२

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, आपले महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता "राष्ट्रीय क्रीडा दिन" निमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करणार आहे. सदर मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिना-या विद्यार्थ्यांनी त्यांची नाव नोंदणी २७ ऑगस्ट २०२२ पर्यंत महाविद्यालयातील क्रीडा विभागात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत येऊन करावी.

(प्रा. प्रतिमा लोणारी)
शारीरिक शिक्षण संचालिका
Director of Phy. Edn.
H. R. Mahavidyalaya
Rajgurunagar, Pune.

(डॉ. एस. एस. पिंगळे)
प्राचार्य
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar, Tal. Khed,
Dist. Pune. 410 505.

Scanned with ACE Scanner



Boys Marathon starting point



Receiving the First prize of the Girls Marathon competition from the dignitaries

Scanned with ACE Scanner




Winners of the Marathon competition with dignitaries

**पुढारी**

# क्रीडा संस्कृती जोपासा : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील



मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व इतर मान्यवर.

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

बदललेल्या जीवनशैलीमुळे शारीरिक तंदुरुस्ती जोपासण्याची गरज सर्वच वयोगटांमध्ये निर्माण झाली आहे. त्यासाठी समाजात क्रीडाविषयक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक क्रीडा संस्कृती जोपासून समाजाचे प्रबोधन करण्याची आवश्यकता असल्याचे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सोमवारी (दि. २९) मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. निशाद खांगटे, रवींद्र रोकडे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी ५ किलोमीटर तर विद्यार्थिनींसाठी ३ किलोमीटर अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवताना जिद्द व सातत्य राखत उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील राहावे. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. होलेवाडी बायपास हायवेवर घेण्यात आलेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक ऋतिक इंगळे, द्वितीय क्रमांक सौरभ मुळूक, तृतीय क्रमांक दत्ता मुळुक यांचा तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक ऐश्वर्या खळदकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी राळे, तृतीय क्रमांक कोमल सावंत यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयाच्या वतीने रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी, तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

My Gramin Edition
Aug 30, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

Paper news dated 30 Aug 2022 in Pudhari Paper

Scanned with ACE Scanner

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

लोकमत

# जीवनशैली बदलल्याने क्रीडा संस्कृती जोपासावी

## ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक क्रीडा संस्कृती जोपासून समाजाचे प्रबोधन करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉन स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. निशाद खांगटे, रवींद्र रोकडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी ५ कि.मी., तर विद्यार्थिनींसाठी ३ कि.मी. अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

बुट्टे पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवताना जिद्द व सातत्य राखत उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील राहावे. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक क्रतिक इंगळे, द्वितीय क्रमांक सौरभ मुळूक, तृतीय क्रमांक दत्ता मुळूक यांनी, तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक ऐश्वर्या खळदकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी राळे, तृतीय क्रमांक कोमल सावंत यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

Hello Pune Gramin
Page No. 6 Sep 02, 2022
Powered by: erelego.com

Paper news dated 2 Sep 2022 in Lokmat Paper

Scanned with ACE Scanner